# टेंट ड्रेस

*या ट्यूटोरियल मध्ये आपण असाच एक टेंट ड्रेस शिवायला शिकणार आहोत.*






**लागणारे साहित्य**

तुमच्या आवडीनुसार तीन मीटर लांब आणि ६० इंच रुंदीचे कापड.
आम्ही यासाठी सॉफ्ट डेनिम फॅब्रीक निवडले आहे.
टेंट ड्रेसचे टेम्प्लेट, जे तुम्ही आमच्या www.ushasew.com
या वेबसाइटवरून डाऊनलोड करून घेऊ शकता.
चॉक
कात्री
रुलर
मेजरींग टेप
मॅचींग दोरे
आणि बिडेड पिन




या ट्यूटोरियलमध्ये आम्ही तुम्हाला टेम्प्लेट अनुसार कपडा कट करायला, फ्रंट आणि बॅक पीस जोडायला, नेकलाइन फिनिशिंग करायला, यासोबतच साईड सिम आणि बॉटम हेम फिनिशिंग कसे करावे ते शिकवणार आहोत.

## स्टेप 1 टेम्प्लेट मेकिंग आणि फॅब्रिक कटिंग












सर्वप्रथम आपण निवडलेल्या डेनिम फॅब्रिकची त्याच्या सुलट बाजू समोरासमोर येतील अशी मधोमध घडी घाला. कपड्याची उलट बाजू तुमच्यासमोर आहे याची खात्री करून घ्या.

टेम्प्लेटचा फ्रंट पीस घेऊन तो कपड्यावर ठेवा. टेम्प्लेटच्या फ्रंट पिसची फोल्ड असे मेन्शन केलेली बाजू कपड्याच्या फोल्डवर आल्याची खात्री करून घ्या. बीडेड पीनच्या मदतीने टेम्प्लेट कपड्याला पक्के जोडून घ्या. चॉकने टेम्प्लेटचा आकार कपड्यावर व्यवस्थित आखून घ्या. ट्रेसिंग पूर्ण झाले की पिन काढून टाकून टेम्पलेट कपड्यावरून बाजूला सरकवा. मार्किंग केलेल्या लाईनवरून कपडा कात्रीने व्यवस्थित कट करून घ्या. तुमचा फ्रंट पीस तयार आहे.

याच पद्धतीने बॅक टेम्प्लेट देखील कट करायचे आहे. टेम्प्लेटची फोल्ड असे मेन्शन केलेली बाजू कपड्याच्या फोल्डवर आली असल्याची खात्री करून घ्या. पिन लावून टेम्प्लेट कपड्यावर पक्के जुळवून घ्या. चॉकच्या मदतीने टेम्प्लेटचा आकार कपड्यावर काढून घ्या. ट्रेसिंग पूर्ण झाल्यावर टेम्पलेट कपड्यावरून बाजूला सरकवा. मार्किंग लाईन वरून कपडा कात्रीने व्यवस्थित कट करून घ्या. तुमचा बॅक पीस देखील तयार आहे.

## स्टेप 2  शोल्डर आणि स्लीव्हज शिवून फ्रंट आणि बॅक पीस एकमेकांना जोडणे












आपण आत्ता कट केलेल्या कपड्यामधून बॅक पीस घेवून तो संपूर्ण उघडा आणि टेबलवर पसरवा. बॅक पीसची उलट बाजू टेबलवर तर सुलट बाजू तुमच्या समोर असली पाहिजे. ही कपड्याची उलट बाजू तर ही सुलट बाजू आहे. आता फ्रंट पीस घेऊन तो बॅक पीसवर पसरवा. हे दोन्ही पीस आपण एकत्र जोडणारा आहोत. इथे दाखवल्याप्रमाणे, दोन्ही पीसच्या सुलट बाजू समोरासमोर असल्या पाहिजेत हे लक्षात ठेवा.

आता आपण शोल्डर ते स्लिव्हपर्यंतचे शिवणकाम करणार आहोत. फ्रंट आणि बॅक पीस पिन लावून एकमेकांना पक्के जोडून घ्या. या ड्रेसचे शिवणकाम करण्यासाठी आपण उषा जेनोम वंडर सिटी प्लस मशीन वापरणार आहोत. एका स्लिव्हचा एंड  पोर्शन मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवा. मशीनचा स्टिच सेलेक्टर डायल A वर तर स्टीच लेंथ 2.5 वर सेट करा आणि शिवणकाम सुरू करा. टीप सुरू करताना  टाके पक्के व्हावेत यासाठी सुरुवातीला काही रिव्हर्स स्टीच घ्या. संपूर्ण स्लिव्ह शिवून घ्या आणि नेक पोर्शनजवळ पोहोचलात की शिवणकाम थांबवा. टीप संपवताना परत एकदा काही रिव्हर्स स्टिचेस घ्या.

याच पद्धतीने आपण दुसरी स्लिव्हदेखील जोडणार आहोत. दुसरी स्लीव्ह जोडून झाली की दोरा कट करून टाका. तुमचे शिवणकाम असे दिसेल. आता आपण कपड्याच्या काठाचे दोरे निघू नयेत म्हणून त्यावर झीगझॅग टिप मारणार आहोत. त्यासाठी स्लिव्हचा काठ मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवा. मशीनचा स्टीच सेलेक्टर डायल C वर तर स्टीच लेन्थ 1.5 वर सेट करा. नेक पोर्शनकडून स्लिव्हच्या टोकापर्यंत टीप मारा. झीगझॅग टीप मारताना रिव्हर्स स्टीच घेण्याची गरज नाही. याच प्रकारे दुसऱ्या स्लिव्हच्या काठावर देखील टीप मारा. यावेळेला स्लिव्हच्या काठाकडून नेक पोर्शनकडे टीप मारत जा. शिवण पूर्ण झाले की अनावश्यक दोरे कट करून टाका. तुम्ही शिवलेले काठ असे दिसतील.

## स्टेप 3 नेक लाईन फिनिशिंग










नेक लाईनला परफेक्ट फिनिशिंग आणण्यासाठी आपल्याला बायस स्ट्रीपची गरज आहे. काळजी करू नका, बायस स्ट्रीप कशी कट करायची ते आम्ही तुम्हाला शिकवणार आहोत. कट करून उरलेल्या कपड्याचा तुकडा घ्या. इथे दाखवल्याप्रमाणे या कपड्यावर स्केलच्या मदतीने 45 अंशाचा कोन करेल अशी तिरकी रेघ आखून घ्या. आता मेजरींग टेपच्या मदतीने दिड इंच अंतरावर रुंदीच्या खुणा करून घ्या. या सगळ्या खुणा एकमेकांना एका रेघेत जोडून घ्या. आपल्याला 3 बायस स्ट्रीपची आवश्यकता आहे. नेक फिनिशिंगसाठी 1 तर स्लिव्हज फिनिशिंगसाठी 2 स्ट्रीप लागतील. त्यामुळे या पद्धतीने एकूण 3 बायस स्ट्रीप आखून घ्या. आखणी झाली की कात्रीच्या मदतीने या स्ट्रीप व्यवस्थित कट करून घ्या. आपल्या तीनही बायस स्ट्रीप रेडी आहेत.








आता आपला ड्रेस आणि स्ट्रीप एकमेकांना जोडण्यासाठी मशीनवर घ्या. प्रथम आपण नेक लाइन फिनिशिंग करणार आहोत. इथे दाखवल्याप्रमाणे शोल्डर जॉइंटच्या उलट बाजूवर बायस स्ट्रिपची सुलट बाजू ठेवा. कपडा मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवा. मशीनचा स्टीच सेलेक्टर डायल A वर तर स्टीच लेन्थ 2.5 वर सेट करा. संपूर्ण नेक लाईनवर बायस ट्रिप जोडून घ्या. बायस स्ट्रीप जिथून जोडायला सुरुवात केली तिथे पोचण्या आधी थोड्या अंतरावर थांबा. कपडा मशीनच्या प्रेसर फुट खालून बाजूला काढून घ्या. बायस स्ट्रिपचा काठ शोल्डर जॉइंटला व्यवस्थित जुळवून घ्या आणि हा जॉईंट काही टाके घेऊन पक्का करा. एक्सेस स्ट्रीप कात्रीने कट करून टाका. आता कपडा पुन्हा एकदा मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवून आपण जिथे शिवायचे थांबलो होतो तिथून जिथे स्ट्रीप जोडायला सुरुवात केली होती यातला गॅप व्यवस्थित शिवून घ्या. या प्रकारे संपूर्ण नेक लाइनला बायस स्ट्रिप जोडून घ्या.




आता पुढच्या भागाकडे लक्ष द्या. ही बायस स्ट्रीप सुरुवातीला सुलट बाजूला पाव इंच फोल्ड करा आणि आणखीन एकदा सिम लाईनच्या वरच्या बाजूने फोल्ड करा. कपड्याच्या सुलट बाजूवर टाके घेऊन हा फोल्ड पक्का करा. अनावश्यक दोरे कट करून टाका.

शिवणकाम केलेली नेक लाइन अशी दिसायला हवी.



## स्टेप 4 साईड सीम फिनिशिंग




साईड सीम फिनिशिंग पूर्ण करण्यासाठी स्लीव्ह हेमपासून शिवणकाम सुरू करू आणि ड्रेसच्या तळापर्यंत शिवण करू. एका स्लीव्हचा ओपन एंड प्रेसर फुट खाली ठेवा आणि त्यावर स्ट्रेट स्टिचने टिप मारा. आर्म होलच्या भागातले शिवण काम अत्यंत काळजीपूर्वक करा जेणेकरून त्याला व्यवस्थित आकार येईल. याप्रकारे शिवत ड्रेसच्या बॉटम लाईनपर्यंत पोचलात की अनावश्यक दोरे कट करून टाका. फिनिशिंग टच देण्यासाठी आता आपण काठावर झीगझॅग स्टीच ने टीप मारणार आहोत. स्लिव्ह मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवा आणि मशीनचा स्टीच सेलेक्टर डायल C वर तर स्टिच लेन्थ 1.5 वर सेट करा आणि स्लिव्हपासून ड्रेसच्या बॅक पर्यंत झीगझॅग स्टीचने टीप मारा. तुमची टीप अशी दिसेल. आता आपल्याला अंडर आर्मच्या भागात स्लॅशेस घेणे गरजेचे आहे. स्लॅशेसमूळे सीम वर सुरकुत्या पडणार नाहीत.






नंतर आपण असेच शिवणे, झीगझॅग टिप मारणे आणि आर्म होल एरियात स्लॅशेस घेणे या कृतीने दुसरी बाजू देखील पूर्ण करणार आहोत.















## स्टेप 5 स्लीव्ह हेम फिनिशिंग

आपण यापूर्वी ज्या 2 एक्सट्रा  बायस स्ट्रीप तयार करून घेतल्या होत्या त्या आता स्लिव्ह हेम फिनिशिंगसाठी वापरणार आहोत. त्यापैकी एक बायस स्ट्रीप घेऊन ती स्लिव्हच्या काठावर ठेवा. बायस स्ट्रीपची सुलट बाजू ड्रेसच्या उलट बाजूवर येईल अशी ठेवा. मशीनचा एक्सेसरी बॉक्स काढून टाका त्यामुळे स्लीव्हच्या सर्क्युलर सिमवर व्यवस्थित शिवणकाम करता येईल. कपडा मशीनच्या प्रेसर फुट खाली व्यवस्थित जुळवून घ्या मशीनच्या स्टीच सिलेक्टर डायलवर स्ट्रेट स्टीच सिलेक्ट करा आणि स्टीच लेन्थ 2.5 ठेवा. शिवणकाम सुरु करा आणि स्लिव्हच्या संपूर्ण घेरावर टीप मारून घ्या. ट्यूटोरियलमध्ये दाखवल्याप्रमाणे आपण जसे नेक लाईन फिनिशिंग केले त्याचप्रमाणे  एक इंच एक्स्ट्रा बायस स्ट्रिप ठेवून संपूर्ण घेरावर स्ट्रेट स्टिचने टीप मारून घ्या. अनावश्यक दोरे कट करून टाका. नंतर स्लिव्ह सरळ करून घ्या. आता बायस स्ट्रिप सुरुवातीला पाव इंच आणि नंतर एकदा पाव इंच सीम लाईन वर फोल्ड करा. स्लिव्ह मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवा आणि संपूर्ण स्लीव्हच्या घेरावर स्ट्रेट स्टिचने टीप मारून घ्या. अनावश्यक दोरे कट करा. तुमची स्लीव्ह तयार आहे. तुमची फिनिश केलेली स्लीव्ह अशी दिसायला हवी. याच पद्धतीने दुसऱ्या स्लिव्हचेही फिनिशिंग करून घ्या.








## स्टेप 6 बॉटम हेमचे फिनिशिंग

हे अगदी इझी ब्रिझी काम आहे. इथे दाखवल्याप्रमाणे ड्रेस बॉटम दोन वेळा अर्धा अर्धा इंच फोल्ड करा आणि ड्रेसच्या संपूर्ण बॉटम लाईनच्या या फोल्डवर स्ट्रेट स्टिचने टिप मारून घ्या. तुमच्या ड्रेसची बॉटम लाइन तयार आहे. तुम्ही टेंट ड्रेस शिवण्याची संपूर्ण प्रक्रिया लीलया पार केली आहे. यासाठी स्वतःला शाब्बासकी द्या.हा ड्रेस वेगवेगळ्या प्रकारे सुशोभित करण्यासाठी तुमच्याकडे अनेक ऑप्शन्स आहेत. बाजारात उपलब्ध असलेल्या रिबन आणि सिक्वंझ ड्रेस सुशोभीकरणासाठी तुम्ही वापरू शकता. उषा जेनोम रिबन सिक्वंझ फूट वापरून तुम्ही आत्ता पूर्ण केलेला टेंट ड्रेस आणखी जास्त सुशोभित करू शकता.
सिक्वंझ फूट कसे वापरावे याबद्दलची माहिती तुम्ही आमच्या www.ushasew.com या वेबसाइटवरून मिळवू शकता. याबाबतचे ट्यूटोरियलही वेबसाईटवर उपलब्ध आहे.



तुम्ही आत्ता जी कलाकृती पूर्ण केली आहे त्याचा तुम्हाला नक्कीच अभिमान वाटत असेल. तुम्ही शिवलेल्या ड्रेसचा फोटो काढा आणि तुमच्या मित्रांबरोबर शेअर करा किंवा सोशल मीडिया हँडलवर अपलोड करा. तुम्ही तुमची कल्पनाशक्ती वापरून हा टेंट ड्रेस आणखी वेगवेगळ्या प्रकारे सजवू शकता.